**RNI No. MAHBIL /2009/37831**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

**वर्ष १२, अंक ११७]** **गुरुवार, सप्टेंबर ३, २०२६/भाद्रपद १२, शके १९४८** **[पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००**

**असाधारण क्रमांक ५०१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ सप्टेंबर, २०२६.

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०१५/१७४५/प्र.क्र.५७३/मुद्रांक-२.—ज्याअर्थी, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महसूल व वन विभागाने काढलेला शासकीय आदेश, महसूल व वन विभाग, क्रमांक मुद्रांक २०१५/१७४५/यु.ओ.आर. २४/प्र.क्र. ५७३/मुद्रांक-१ दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त आदेश" असा केला आहे) नुसार परवडणाऱ्या घरांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-सर्वांसाठी घरे (शहरी) अंतर्गत पात्र आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लाभार्थ्यांसाठी (ईडब्लूएस) एक हजार रुपयांपर्यंत मुद्रांक शुल्कात कपात केली आहे आणि सवलतीसाठी लाभार्थ्यांचा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्लूएस) दर्जा व पात्रता प्रमाणित करण्यासाठी उपविभागीय अधिकाऱ्यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केलेले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनास, जनहितार्थ तसे करणे आवश्यक असल्याचे खात्री पटल्याने, सक्षम प्राधिकरणाच्या बाबतीत बदल करणे इष्ट आहे, असे वाटते.

त्याअर्थी आता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, शासकीय आदेश महसूल व वन विभाग, क्रमांक मुद्रांक २०१५/१७४५/यु.ओ.आर. २४/प्र.क्र. ५७३/मुद्रांक-१ दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त आदेशात, शर्तीमधील, "संबंधित क्षेत्राचे उपविभागीय अधिकारी (एस.डी.ओ.)" या मजकुराऐवजी, "संबंधित तहसीलचे तहसीलदार" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सत्यनारायण बजाज,**
शासनाचे सहसचिव.

**REVENUE AND FORESTS DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated 3rd September, 2026.

*NOTIFICATION*

Maharashtra Stamp Act.

No. Mudrank-2015/1745/C.R.No.573/Mudrank-2.—Whereas the Revenue and Forests Department has *vide* Government Order, Revenue and Forests Department, No. MUDRANK-2015/1745/U.O.R. 24/C.R. 573/M-1, dated the 1 December 2016 (hereinafter referred to as "the said order") issued in exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958), reduced the stamp duty to one thousand rupees for eligible Economically Weaker Section (EWS) beneficiaries under Pradhan Mantri Awas Yojana-Housing for all (Urban), to promote affordable housing and declared the Sub-divisional Officer as the Competent Authority to certifies the beneficiary's EWS status and eligibility for the concession;

And whereas, being satisfied that it is necessary to do so in the public interest, the Government consider it expedient to make changes with respect to the Competent Authority.

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958), the Government of Maharashtra, hereby amends, the Government Order, Revenue and Forest Department No. MUDRANK-2015/1745/U.O.R. 24/C.R. 573/M-1, dated the 1st December 2016 as follows, namely :—

In the said Order, in the condition, for the words, brackets and letters "Sub-Divisional Officer (S.D.O.) of respective area" the words "Tahsildar of the respective Tahsil" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATYANARAYAN BAJAJ,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.